# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२२२७ /२०१८ दि.२८/०६/२०१८

## परिपत्रक

विषय :- आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणेबाबत..

संदर्भ :- मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/ईबिसी/७२१२, दि. २२/०६/२९१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजषी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन मान्यता प्राप्त व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रूपये ६.०० लाखावरून वार्षीक रूपये ८.०० लाख करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्वांनी संदर्भीय पत्रान्वये संलग्नित शासन निर्णयाप्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव अग्रेषीत :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, प्रस्तृत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(डॉ. गो. दा. दुबे)
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ. गडचिरोली

F:\BBDD\LATTER\Circular\228

3001 28/6/18
5417 28/6/18

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

5131 28/6/18

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/ईबीसी/ 7212 दि. २२/०६/२०१८

**परिपत्रक**

**विषय:-** **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणेबाबत..**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2825 दि. 26.6.18
जावक क्र. ........ दि. ........

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन परिपत्रक क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि. १४.०२.२०१८
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/२०२७, दि. १७.०२.२०१८
४. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र. ३५/तांशि-४, दि. ३१.०३.२०१८
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/४४३२, दि. ०९.०४.२०१८

उपरोक्त विषयाबाबत दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजषी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४२ अन्वये सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांस अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल.** तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(डॉ. मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत :- १. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या विद्यापीठांतील कुलसचिव व महाविद्यालयांतील प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

२. कुलसचिव, अकृषि विद्यापीठे
सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांतील प्राचार्य व त्यांचे मार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणेत याव्यात.

३. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, टप्पा अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग तसेच कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांचे मार्फत.

Scanned by CamScanner